# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या पाचव्या सभेचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२० नोव्हेंबर, २०१२ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची पाचवी सभा दि.२० नोव्हेंबर, २०१२ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ.बंडगर बी.पी.- कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग | सदस्या |
| ३) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. - संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | डॉ. नवले एस. एम. | सदस्य |
| ५) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ.चिट्टे जी.एन. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ.देशमुख ए.एल. | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| ११) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| १२) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| १४) | प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी. | सदस्य |
| १६) | प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. | सदस्य |
| १७) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १८) | श्री. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १९) | श्रीमती जाधव आर. जी. अध्यक्ष, विद्यार्थी परिषद | सदस्या |
| २०) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. | सचिव |
| २१) | डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| २२) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २३) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २४) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २५) | डॉ. गायकवाड सयाजीराव पांडूरंग | सदस्य |
| २६) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| २७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २८) | डॉ.बारबोले ए.एन. | सदस्य |
| २९) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |
| ३०) | डॉ. श्रीमती दळवी आर.जे. | सदस्या |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ३१) | डॉ. गेंगजे एस. आर. | सदस्य |
| ३२) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ३३) | डॉ. श्रीमती आपटे एस. एस. | सदस्या |
| ३४) | डॉ. श्रीमती याजमान्य एस.आर. | सदस्या |
| ३५) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३६) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ३७) | श्री. गायकवाड संपतराव पांडूरंग | सदस्य |
| ३८) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ३९) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ४०) | श्रीमती विभूते एस. बी. | सदस्या |
| ४१) | श्रीमती जमादार एम. पी. | सदस्या |
| ४२) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ४३) | श्री. सलगर बी.एस. | सदस्य |
| ४४) | श्री. जमादार के.एम. | सदस्य |
| ४५) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ४६) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ४७) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ४८) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ४९) | डॉ. जोशी पी. बी. | सदस्य |
| ५०) | डॉ. कृष्णमूर्ती एम. | सदस्य |
| ५१) | डॉ. श्रीमती रंगरेज ए. एम. | सदस्या |
| ५२) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ५३) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५४) | श्री. घागरे एम. व्ही. | सदस्य |
| ५५) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ५६) | श्री. बारबोले ए. ए. | सदस्य |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे तसेच अधिसभेवर नव्याने नामनिर्देशित झालेले प्राचार्य धुत्तरगाव एस. सी., प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी., प्राचार्य श्री. राजमाने एन. आर., प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम., कु. जाधव आर. जी. अध्यक्ष विद्यार्थी परिषद, श्री. आदटराव एम. एन. सचिव विद्यार्थी परिषद, श्री. बारबोले ए. ए. यांचे स्वागत केले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

डॉ. गांधी आर. एच., श्रीमती पद्मजादेवी मोहिते-पाटील, डॉ. सूर्यवंशी ए. बी., प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी पत्राद्वारे तसेच डॉ. शिंदे एस. व्ही., डॉ. पाटील आर. आर., डॉ. भोसले यु. व्ही., डॉ. गवळी आर. एस., श्री. वाघमोडे एस. एम., श्री. व्हनकळस डी. डी. व डॉ. आवताडे एच. के. यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाण्यासंबंधी कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना चौथी अधिसभा व पाचवी अधिसभा बैठक या दरम्यानच्या कालावधितील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

- सोलापूर विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व संलग्न महाविद्यालयातील माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांच्याकरीता दिनांक १६ मार्च, २०१२ रोजी एकदिवसीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या विषयावर विद्यापीठात कार्यशाळा संपन्न झाली.
- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विद्यापीठास नॉन १२ बी अंतर्गत ५ कोटी विद्यापीठातील प्रशासकीय इमारत बांधकाम, सुरक्षा भिंत बांधकाम, आरोग्य केंद्र इमारत बांधकाम तसेच अतिथीगृहाचे वाढीव बांधकाम इत्यादी कामासाठी मंजूर झालेले आहेत. त्यापैकी २.५ कोटी विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.
- विद्यापीठातील विविध संकुले / अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी प्रवेश परीक्षा दिनांक ०५ जून ते ०८ जून, २०१२ अखेर घेण्यात आल्या.
- ज्या संलग्नित महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य, मंजूर कार्यभारानुसार प्राध्यापकांची सर्व पदे, नॅक मूल्यांकन व विद्यार्थ्यांचा संगणक कार्ड प्रणाली उपस्थिती अहवाल व इतर आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नाही अशा महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश बंद करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता एकूण ४१ महाविद्यालयांचे प्रवेश बंद करण्यात आले होते, त्यापैकी आवश्यक बाबींची पूर्तता केल्याने एकूण ०८ शिक्षण शास्त्रे महाविद्यालयांचे शिक्षकांच्या प्रमाणात प्रवेश पूर्ववत करण्यात आले.
- SUS-PET-3 पीएच.डी. प्रवेश परीक्षा ०१ जुलै, २०१२ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेस गुणवत्तेनुसार पात्र विद्यार्थ्यांच्या मुलाखती विभागीय संशोधन समितीसमोर दि.१०/०९/२०१२ ते दि.२६/०९/२०१२ या कालावधीत घेण्यात आल्या. तसेच दि.०२ नोव्हेंबर २०१२ ते ०९ नोव्हेंबर २०१२ दरम्यान आयोजित संशोधन व मान्यता समितीत मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक १० मे, २०१२ ते २० मे, २०१२ या दरम्यान ज्ञानतिर्थ नगर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे उन्हाळी राज्यस्तरीय मेघा विशेष श्रमसंस्कार शिबीर हे लोकसहभागातून आयोजित करण्यात आले होते. शिबीराचा खर्च हा लोकसहभागातून करण्यात आला. तसेच या शिबीरामध्ये एकूण २०० स्वयंसेवक / स्वयंसेविका/ कार्यक्रम अधिकारी सहभागी झालेले होते.

- सामाजिक वनीकरण महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत सोलापूर विद्यापीठास वनीकरण, पडिक जमिन विकास व तत्सबंधिंची जनजागृती या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल "छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार, २०१०" प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या शुभहस्ते दि.०६/०६/२०१२ रोजी प्रदान करण्यात आला असून सदर पुरस्कार विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव कॅप्टन डॉ. नितिन सोनजे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. तुकाराम शिंदे यांनी स्विकारला.

- सन २०१२-१३ या वर्षाचा 'आव्हान-२०१२' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचा कार्यक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी येथे दि.०७ जून, २०१२ ते १६ जून २०१२ या कालावधीत संपन्न झाला. शिबीराकरीता या विद्यापीठातील मुले, मुली आणि संघनायक असे एकूण ३२ जणांनी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणमध्ये आपला सहभाग नोंदविला.

- महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ७७ अन्वये विद्यापीठाच्या विविध संकुलात शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता एकूण २८ शिक्षक हजर झाले आहेत.

- विद्यापीठाचा आठवा वर्धापन दिन समारंभ दि. ०१ ऑगस्ट, २०१२ रोजी प्रमुख पाहूणे मा. ॲड. रावसाहेब पांडूरंग शिंदे, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे शुभहस्ते संपन्न झाला.

- आषाढी यात्रेनिमित्त श्री. संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षेत्रात आगमन अनुक्रमे दि.२४ जून आणि २५ जून, २०१२ रोजी झाल्याने सालाबादप्रमाणे यांही वर्षी विद्यापीठाच्या वतीने पालखींचे स्वागत करण्यात आले.

- सन २०१२-१३ मध्ये अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्विमींग आणि डायव्हिंग स्पर्धेमध्ये श्री केतन शिंदे यांनी रौप्य पदक मिळविले.

- राष्ट्रीय सेवा योजना विभागाची सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षामधील कार्यक्रम अधिकाऱ्यांची कार्यनियोजन बैठक दि.३१ जुलै, २०१२ रोजी विद्यापीठात संपन्न झाली.

- दैनिक भास्कर समूहातर्फे दि.१५/०९/२०१२ रोजी औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये विद्यापीठास ग्रीन आयडॉल आवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

- विद्यापीठाचा नववा युवक महोत्सव दि.०४ ते ०७ ऑक्टोबर, २०१२ या कालावधीमध्ये भगवंत इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी येथे संपन्न झाला. या महोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमामध्ये एकूण ६० महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. श्री शिवाजी महाविद्यालय,

बार्शी या महाविद्यालयास सर्वसाधारण विजेते पदाचा फिरता चषक, द्वितीय क्रमांकाचा फिरता चषक वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांना तर तृतीय क्रमांकाचा फिरता चषक शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज यांन प्रदान करण्यात आला.

- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी तयार करण्यात आलेला शैक्षणिक बृहत आराखडा वर्तमान पत्रात तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.
- शिक्षकांची नियमित वरिष्ठ/ निवड श्रेणीत स्थान निश्चिती करण्यासाठी संलग्नित ३१ महाविद्यालयाकडून एकूण १४८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. या प्रस्तावांची स्थान निश्चिती करण्यासाठी दि.०६/०९/२०१२ व दि.०७/०९/२०१२ रोजी विद्यापीठ कार्यालयात शिबीर आयोजित करण्यात आले होते. प्रस्तावावरील कार्यवाही पूर्ण करुन मा.विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग यांच्या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित केले आहे.
- चेंजेस इन स्टाफ समितीची बैठक दि.१३/०९/२०१२ व दि.१४/०९/२०१२ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत बैठकीत केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठ प्राधिकरणाची मान्यता घेऊन संबंधितांना चेंजेस इन स्टाफ मान्यता पत्र पाठविण्यात येत आहे.
- विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव-२०१२ आयोजन करण्यासाठी सांगोला माहविद्यालय, सांगोला यांना विद्यापीठाकडून आयोजन करण्यासाठी यजमान पद देण्यात आले. विद्यापीठस्तरीय "अविष्कार संशोधन महोत्सव-२०१२" च्या नियोजनाची प्राथमिक बैठक सांगोला महाविद्यालय, सांगोला येथे दि.१७/११/२०१२ रोजी संपन्न झाली.
- पत्रकारीता व जनसंज्ञापन विभागातर्फे दि.२८ ऑगस्ट, २०१२ रोजी 'शतक सिनेमाचे' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.
- दि.१४ आणि १५ सप्टेंबर, २०१२ रोजी 'सामाजिक प्रश्न आणि विकास पत्रकारीता' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राचे अतिरीक्त वनसंरक्षक (निवृत्त) श्री. व्ही. के. मोहन यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले.
- दि.१४/०९/२०१२ रोजी Concern for Ozone Depletion day साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून श्री. व्ही. के. मोहन, पुणे हे उपस्थित होते.
- २७ सप्टेंबर, २०१२ हा जागतिक पर्यटन दिन प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व शास्त्र विभागात साजरा केला.
- ०६ सप्टेंबर, २०१२ रोजी नेट व सेट परीक्षासाठी विद्यार्थ्यांनी कशी तयारी करावी या विषयावरती मा. प्रा. डॉ. एस. एच. पवार, कुलगुरु, डी. वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर यांचे पाहुणे व्याख्यान पार पडले.

- विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व राष्ट्रीय शैक्षणिक योजना एवंम प्रशासन विश्व विद्यालय, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या DCF-I व DCF-II या तक्त्यामधील माहिती तयार करुन ती अपलोड करण्याबाबत सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुलांची माहिती भरण्याबाबत दि.२०/१०/२०१२ रोजी विद्यापीठ सभागृहात कार्यशाळा आयोजित केली होती. सदर कार्यशाळेत संलग्न महाविद्यालयातील ४५ नोडल ऑफिसर / प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी मा.शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे विभागाचे नोडल ऑफिसर श्री. भिष्म बिरादार यांनी मार्गदर्शन केले.

- विद्यापीठाचा आठवा दीक्षांत समारंभ गुरुवार दि.०१ नोव्हेंबर, २०१२ रोजी संपन्न झाला. सदर समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष मा. डॉ. अरुण निगवेकर हे उपस्थित होते.

- रसायनशास्त्र संकुलामार्फत दि.०२/११/२०१२ ते ०४/११/२०१२ या कालावधीमध्ये "रसायनशास्त्रातील नवे प्रवाह" ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेमध्ये एकूण ३८७ संशोधकांनी सहभाग नोंदवला. एकूण २२ नामांकित प्राध्यापक आणि शास्त्रज्ञांनी विशेष व्याख्याने दिली.

- १२ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले संशोधन प्रकल्प विद्यापीठ अनुदान आयोग कार्यालय, पुणे यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले.

- अहवाल कालावधीत अखील भारतीय अंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता विद्यापीठातून हॉकी मुलांची टीम राजस्थान विद्यापीठ, जयपूर, मल्लखांब मुलांची टीम कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र, चेस मुलांची टीम विक्रम विद्यापीठ, उज्जैन तर बास्केटबॉल मुलींची टीम लक्ष्मीबाई राष्ट्रीय विद्यापीठ, ग्वॉलिअर येथे रवाना झाल्या.

- दि.०५/११/२०१२ ते ०९/११/२०१२ या कालावधीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपन्न झालेल्य युवा महोत्सव इंद्रधनुष्य समारंभामध्ये सोलापूर विद्यापीठामधून एकूण ४० कलाकार सहभागी झाले होते.

| **युवा महोत्सव इंद्रधनुष्यः प्राप्त आठ पारितोषिके** | | |
|---|---|---|
| अ. क्र. | सहभागाचा प्रकार | क्रमांक |
| १ | लावणी | प्रथम |
| २ | एकांकिका | प्रथम |
| ३ | स्पॉट पेन्टींग | प्रथम |
| ४ | शोभायात्रा | द्वितीय |
| ५ | वक्तृत्व | द्वितीय |
| ६ | स्कीट | तृतीय |
| ७ | मुकनाटय | तृतीय |
| ८ | पोस्टर मेकींग | तृतीय |

सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] अधिसभेच्या दि.२४ मार्च, २०१२ रोजी झालेल्या तिसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

(टिपणीः सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/१५८, दि.९ एप्रिल, २०१२ अन्वये, दि.२४ मार्च, २०१२ रोजी झालेल्या चौथ्या सभेचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.९/०५/२०१२ अशी होती. मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२४ मार्च, २०१२ रोजी झालेल्या चौथ्या सभेचा कार्यवृतांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेस्तव सादर).

**ठरावः अधिसभेच्या दि.२४ मार्च, २०१२ रोजी झालेल्या चौथ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.
(टिपणीः परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र सोबत जोडले आहे).

ठरावः **अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:५४ वाजता सुरु झाला व प्रश्नोत्तरे संपल्याने दुपारी १:४५ वाजता प्रश्नोत्तराचा तास संपला.**
**ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**
**क) प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न क्र. १ ते १४ व त्यावर सदस्यांनी विचारलेल्या उपप्रश्नांची उत्तरे देण्यात आली.**

**[ ३ ] सन २०११-१२ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

श्री. गायकवाड बी. आर. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०११-१२ च्या लेखापरीक्षण अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सन २०११-१२ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालावरील आक्षेप व लेखापरीक्षण अहवाल अंतिम करण्यासाठी समान लेखा संहिता (Common Account Code) तरतुद क्र.1.50 (h) नुसार मा. कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालील उपसमिती गठीत केली.

१) श्री. गायकवाड बी. आर. - सदस्य
२) डॉ. कुलकर्णी बी. एच. - सदस्य
३) श्री. रिसबूड एस. एच. - निमंत्रित तज्ञ सदस्य

या समितीने दि.०५/१०/२०१२ रोजी बैठक घेवून लेखापरीक्षण अहवालाबाबत सविस्तर चर्चा केली व त्यावर अभिप्रायासह त्यांचा अहवाल वित्त व लेखा विभागाकडे सादर केला. उपसमितीने सुचित केल्याप्रमाणे लेखापरीक्षण अहवालाबाबत कार्यवाही करुन तो व सन २०११-१२ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७५(२) (छ) (४) नुसार वित्त व लेखा समितीच्या दि.०९/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.०२ अन्वये सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव: विद्यापीठाचा सन २०११-१२ चा लेखापरीक्षण अहवाल सुधारणांसह व्यवस्थापन परिषदेस सादर करण्याबाबत शिफारस करण्यात आली.

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.१६/१०/२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारात सादर केली असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

ठराव: सन २०११-१२ च्या लेखापरीक्षण अहवालाबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस व लेखा आक्षेप पुर्तता अहवाल स्विकारण्यात येवून अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०११-१२ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: श्री. गायकवाड बी. आर. यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास श्री. जमादार के. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) डॉ. बारबोले ए. एन.**
**२) श्री. रिसबूड एस. एच.**
**३) डॉ. बचुटे एम. टी.**
**४) श्री. गायकवाड संपतराव पांडूरंग**
**५) डॉ. रोंगे बी. पी.**
**६) श्री. चौगुले एस. एस.**
**७) प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल.**

**यांनी विचार मांडल्यानंतर लेखापरीक्षण अहवालातील आक्षेप व त्याबाबत कार्यालयाने केलेली पूर्तता यावर मुद्देसूद चर्चा झाली व सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ४ ] अधिसभा सदस्य प्रा. डॉ. काशीद एस. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठाच्या युवकमहोत्सवातील अनेक स्पर्धामध्ये तीस-तीस, चाळीस-चाळीस संघ सहभागी असतात. कधी-कधी ही संख्या त्याहूनही जास्त असते. विद्यापीठ मात्र प्रत्येक स्पर्धेमध्ये फक्त तीन बक्षीसे देते, जो आकडा स्पर्धकांच्या संख्येच्या तुलनेत खूप छोटा आहे म्हणून प्रत्येक स्पर्धेत उत्तेजनार्थ - १ आणि उत्तेजनार्थ - २ अशी अधिकची दोन बक्षीसे देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे.

**ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर व त्यास डॉ. गेंगजे एस. आर. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ५ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यार्थी, मार्गदर्शन व प्रबंध शिर्षकाची यादी तयार करुन ती विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी अशी शिफारस ही अधिसभा महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळास करित आहे.

**ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर व त्यास डॉ. गायकवाड सयाजीराव पांडूरंग यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ६ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठात नव्याने मिळालेल्या ४८२ एकर जागेचा मास्टर प्लॅन तयार करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करित आहे.

**ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर व त्यास प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ७ ] **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

PET च्या अभ्यासक्रमाच्या पेपरची शिर्षके ठरविण्याचा अधिकार संबंधित अभ्यासमंडळास असावा अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर व त्यास डॉ. गायकवाड सयाजीराव पांडूरंग यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ८ ] **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

प्रश्नपत्रिका तयार करण्याकरिता देण्यात येत असलेल्या मानधनात वाढ करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा परिक्षा मंडळास करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर व त्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरु** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |

**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**प्रश्नोत्तरे**

**अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे**

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | **डॉ. भोसले यु. व्ही. यांच्या वतीने डॉ. पवार एन. बी.**<br>सोलापूर विद्यापीठाच्या अधिविभागामध्ये नवीन अनुदानित विभाग सुरु करण्याचा विचार आहे काय?<br>• महाराष्ट्र सरकारचे कायम विनाअनुदानित धोरण बदलले आहे काय?<br>• विद्यापीठाच्या कोणत्या अधिविभागामध्ये नवीन अनुदानित विभाग सुरु करण्याचा विचार आहे?<br>• भाषा संकूलाचा प्रस्ताव पाठविला आहे काय? | **डॉ. शिळीमकर टी. एन.**<br>होय.<br>नाही.<br>School of Education आणि School of Commerce & Management चे प्रस्ताव पाठविलेले आहेत. School of Technology and School of Life Sciences चा प्रस्ताव पाठविला आहे.<br>होय. |
| 2 | सोलापूर विद्यापीठाच्या 2F आणि 12B च्या बाबतीत सदयस्थिती काय आहे?<br>• 12B मान्यता होणार आहे की नाही? याची सद्यस्थिती काय आहे? | UGC letter No. F9-17/2004 (CPP-1) dt.21 March, 2005 अन्वये विद्यापीठास 2F मान्यता आहे.<br>दि.28 April, 2010 च्या पत्रान्वये 12B साठी UGC कडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यानंतरही विविध पत्रान्वये दि.12 ऑक्टोबर, 2012 पर्यंत पत्रव्यवहार झालेला आहे.<br>विद्यापीठ मान्यता देणारी authority नाही. प्रस्ताव पाठवला आहे, पाठपुरावा चालू आहे. |
| 3 | **डॉ. बाड डी. आर.**<br>विद्यापीठ परिक्षेच्या तारखा जाहीर झाल्यानंतर परिक्षा फॉर्म वेबसाईटवर उशिरा उपलब्ध होतात त्यामुळे विद्यार्थ्यांना मुदतीत फॉर्म भरण्यासाठी कमी कालावधी मिळून धावपळ होते. फॉर्म उशिरा उपलब्ध होण्याचे कारण काय?<br>• फॉर्म वेळैत उपलब्ध होण्यासाठी काय उपाययोजना केलेली आहे काय? | **प्राचार्य डॉ. भांजे बी. एम.**<br>विद्यापीठ परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्यानंतर परीक्षा फॉर्म वेबसाईटवर वेळेत उपलब्ध असतात.<br>सुधारीत प्रक्रिया राबवीत आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |
| | ● सुधारीत प्रक्रिया कोणती आहे? | Auto Generation ची सोय केली आहे. |
| 4 | महाविद्यालयाकडून विद्यार्थ्याचचे परिक्षा फॉर्म भरुन विद्यापीठात जमा केल्यानंतर ते तपासून घेण्याची जबाबदारी कोणाची?<br>● परिक्षा फॉर्म तपासण्यासाठी विद्यापीठाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग आहे काय? | परीक्षा विभागाची आहे.<br>आहे. |
| 5 | **डॉ. बारबोले ए. एन.**<br>पीएच् डी प्रवेशपूर्व परीक्षा (PET) पास झाल्यानंतर DRC समितीपुढे ज्यांना बोलावले जाते त्यांची मुलाखत त्याला संशोधन आराखडा (synopsis) आणायला सांगुन त्यावर घेवून गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्याला डावलता येईल काय?<br>● शास्त्र विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मुलाखतीला येताना संशोधन आराखडा (synopsis) आणावा, त्यावर मुलाखत घेतली जाईल हे कोणत्या नियमानुसार सांगितले जाते?<br>● 'मुलाखतीवर आधारीत प्रवेश', नियमांत नसतांना त्यांना प्रवेशाच्या हक्कापासून वंचित ठेवले जाते काय?<br>● शास्त्र विद्याशाखेतील रसायनशास्त्र विषयात गुणवत्ता यादीतील विद्यार्थी डावलून प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे काय?<br>● रसायनशास्त्र विषयातील प्रतिक्षा यादीतील किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे?<br>● विद्यार्थी पूर्णवेळ करतो म्हणून प्रवेश घेतो परंतू प्रत्यक्ष पूर्णवेळ करीत नाही त्याबद्दलचे धोरण काय?<br>● महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परवानगी दिली म्हणजे होते का?<br>● विद्यापीठाने मंजूर केलेल्या Ph.D. नियमावलीमध्ये DRC च्या डयूटीमध्ये मुलाखती घेणे नमुद केले आहे काय? | **प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही.**<br>विभागीय संशोधन समितीसमोर संशोधन आराखडा (Synopsis) आणावयास सांगितले जात नाही. त्यामुळे, त्या आधारावर डावलले जात नाही.<br>शास्त्र विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मुलाखतीला येताना संशोधन आराखडा (synopsis) आणण्यास सांगितले जात नाही. त्यामुळे त्या संदर्भातील नियम असण्याचा प्रश्न उदभवत नाही.<br>विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम - 2009 नियमावली नुसार मुलाखती घेवूनच विद्यार्थ्याचे मार्गदर्शक निश्‍चिती करण्याचा नियम आहे.<br>गुणवत्ता यादीशिवाय कोणाचेही मेरीट डावलले नाही.<br>गुणवत्ता यादी संपल्यानंतर प्रतिक्षा यादी मधील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे.<br>विद्यार्थ्यांकडून तसे लिहून घेतो की महाविद्यालयाची परवानगी आहे आणि ते पूर्णवेळ काम करु शकतात.<br>प्राचार्य व संबंधित मार्गदर्शकाची ही जबाबदारी आहे.<br>होय. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 6 | एम. फिल. पेपर तपासणी परीक्षा झाल्यापासून किती दिवसात (नियमानुसार) पूर्ण करणे सक्तीचे आहे? | एम. फिल. पेपर तपासणी परीक्षा झाल्यापासून कमीत कमी 30 व जास्तीत जास्त 45 दिवसात पूर्ण करण्याची महाराष्ट्र विद्यापीठ कायदयामध्ये तरतुद आहे. |
| | • वाणिज्य शाखेअंतर्गत एम्. फिल. परीक्षेची पेपर तपासणी किती दिवसात (परीक्षा झाल्यापासून) पूर्ण झाली? | प्रश्न संदिग्ध आहे. |
| | • काय संदिग्ध आहे? | वाणिज्य विद्याशाखेअंतर्गत नेमकी कुठली परीक्षा हे नमुद नाही. |
| | • निर्धारीत वेळेते पेपर तपासणी करुन घेण्याची कायदेशीर (नियमानुसार) जबाबदारी कोणाची? | विद्यापीठाच्या परीक्षा विभागाची. |
| 7 | **<u>प्रा. श्रीमती विभूते एस. बी.</u>**<br>पी. एच्. डी. साठीची प्रवेशपूर्व परीक्षेच्या (PET) प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका परीक्षा झालेपासून चार दिवसात विद्यापीठाच्या संकेत स्थळावर टाकण्याचा ठराव अधिसभेने केला होता. त्यानुसार आजपर्यंत अंमलबजावणी झाली काय? | **डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.**<br>परीक्षा मंडळाच्या बैठकीत अधिसभेने केलेल्या ठरावासंबंधी विचार करता सद्यस्थितीत विद्यापीठाकडे उपलब्ध असलेल्या सुविधा अपुऱ्या असल्याने सदर प्रक्रिया करणे विद्यापीठास अशक्य आहे असा ठराव झाला. |
| | • संकेत स्थळावर प्रश्न व उत्तर पत्रिका कोणत्या तारखांना टाकण्यात आल्या? | प्रश्न उद्भवत नाही. |
| | • तशी सूचना (तरतूद) माहितीपत्रकांत नमूद केली आहे काय? | नाही. |
| | • PET ची प्रश्नपत्रिका आणि त्याची Answer key टाकायचे ठरले होते. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका अपलोड करायला काय सुविधा लागते? | स्टाफ अपुरा आहे. |
| | • प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टाकण्यासाठी नेमक्या कोणत्या सुविधा नाहीत? | स्टाफची कमतरता आहे. |
| | • संकेतस्थळावर टाकण्याची नेमकी प्रक्रिया काय आहे? | परीक्षा मंडळाच्या बैठकीत चर्चिल्याप्रमाणे यावर कार्यवाही केली आहे. |
| | • परीक्षा मंडळाचा ठराव जर अधिसभेने संमत केलेल्या ठरावाच्या Contrary होणार होता तर त्याची intimation अधिसभा सदस्यांना मिळावी का नाही? | असा कुठलाही नियम नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | ● विद्यापीठाच्या PET च्या प्रश्नपत्रिका या प्रिंटेड स्वरुपात असतात, उत्तर पत्रिका संगणकीय पध्दतीने तपासल्या जातात तरी संकेतस्थळावर टाकण्यात अडचण काय? | परीक्षा मंडळाने घेतलेला निर्णय आहे. |
| 8 | **<u>डॉ. बारबोले ए. एन.</u>**<br>पीएच् डी शोध प्रबंध (Final) दाखल करण्यापूर्वी स्पायरल बायडींग स्वरुपात प्रबंध दाखल करुन तज्ञ समितीमार्फत दोष, चूका अथवा दुरुस्त्या सूचविल्या जातात, त्या नेमक्या कोणते मुद्दे घेवून विचाराव्या? | **प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही.**<br>Ph.D नियमावली Annexure I नुसार मुद्दे विचारात घेवून विचाराव्या. |
| | ● RRC ने मंजूरी दिलेल्या संशोधन आराखड्यानुसार व मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केलेल्या शोध प्रबंधातील कथित दुरुस्त्या संशोधन आराखड्याला सोडून विचारण्याचा आधिकार त्या तज्ञ समितीला आहे काय? | नाही. |
| | ● सामाजिक शास्त्र विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यार्थ्यास त्याचे संशोधन कार्य दुय्यम स्त्रोतावर (Secondary Data) आधारीत असतांना व सदरच्या आराखड्यास RRC व संशोधन मार्गदर्शकाने मंजूरी देऊन संशोधनाचे काम पुर्ण झाल्यानंतर तज्ञ समितीने प्रथम स्त्रोतावर (Primary Data) काम करण्यास सांगणे नियमाला धरुन आहे काय? | मान्य संशोधन आराखड्याच्या चौकटीत राहून दुरुस्त्या सुचविता येतात. |
| | ● एखाद्या विषयामध्ये मुळ आराखड्याच्या चौकटीबाहेर जावून जर या समितीने दुरुस्त्या सुचविल्या त्यामुळे विद्यार्थ्याचे नुकसान होईल त्याला जबाबदार कोण? | आराखड्याच्या चौकटीत राहूनच दुरुस्त्या सुचविता येतात. |
| | ● सुचविल्या तर कारवाई करणार का? | कारवाई करता येईल. |
| | ● संबंधित अन्याय झालेल्या विद्यार्थ्यांना न्याय कसा देणार? | लक्षात आणून दिल्यानंतर. |
| | ● RRC व DRC यांचे कामकाज नियमाप्रमाणे होते किंवा नाही हे तपासून कसे व कोण पाहते? | DRC चे काम नियमाप्रमाणेच होते. नियमाप्रमाणे झाले नाही असे कोणी निदर्शनास आणून दिलेले नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |
| | ● Synopsis मध्ये जर एखाद्याने Secondary डाटा वर्क केला असेल आणि त्याला जर आता सर्व प्रायमरी डाटावर करुन घेवून ये असे म्हटले तर विद्यार्थ्याचे अन्याय निवारण कोण करणार? | असे विद्यार्थ्याला विचारले गेलेले नाही. अन्याय झालेला नाही त्यामुळे निवारण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| | ● तज्ञ समितीपुढे मुळ रुपरेषा पाठविले जाते का? | Thesis बरोबर Original Synopsis ची copy जात असते. |
| | ● आपल्या विद्यापीठाचे पाठविले जाते का? | होय. |
| 9 | <u>**डॉ. चव्हाण सी. एस.**</u><br>मागील सिनेट मध्ये परिक्षेचे आसन क्रमांक विद्यार्थ्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार असावे असे मंजूर करण्यात आले होते त्याची अंमलबजावणी झाली आहे काय? | **डॉ. सुर्यवंशी एस. एस.**<br>नाही. |
| | ● का झाली नाही? | सर्व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी एकत्रित करुन आद्याक्षरानुसार बैठक क्रमांक दिल्यास बऱ्याच अडचणी येतात. |
| | ● काय अडचणी येतात? | आपल्या परीक्षेचे दिवसाचे तीन सेशन असल्याकारणाने 9 ते 11, 12 ते 2 आणि 3 ते 5 तीन सेमीस्टर एकाच दिवसात असल्याने जर आपण Alphabetical आसन क्रमांक दिल्यास वेगवेगळया परीक्षा केंद्रावर परीक्षा होतात याची अडचण येते. या अडचणी दूर करण्यासाठी सोलापूर शहरातील सर्व महाविद्यालयातील बैठक व्यवस्था Alphabetical केली आहे. |
| | ● जे Alphabetically सांगितले जाते ते Alphabetically सर्व महाविद्यालयाची मुले मिसळून Alphabetically केले जाते का? | सेंटरवाईज Alphabetically आसन क्रमांकाची व्यवस्था केली आहे. |
| | ● सर्व महाविद्यालयामध्ये केले जाते का? | सर्व परीक्षा केंद्रावर Alphabetically आसन क्रमांकाची व्यवस्था केली आहे. |
| | ● या पध्दतीने जर Alphabetically केले तर एकाच महाविद्यालयाची मुले centre च्या कॉलेजवर जातात आणि Mass Copy करुन दादागिरी करतात त्याला जबाबदार कोण? | ज्या शहरामध्ये एकापेक्षा जास्त महाविद्यालये असतील आणि एकाच फॅकल्टीचे असतील तिथे आपण पूर्णत: तशी व्यवस्था केली आहे. चार महाविद्यालये जर एकाच centre ला टाकली तर एका हॉलमध्ये alphabetically चार महाविद्यालयाची मुलं येतात. |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th colspan="3">उत्तर</th></tr>
<tr><td>10</td><td>प्रत्येक महाविद्यालयाकडून प्राध्यापक व शिकवित असलेल्या पेपर क्रमांकाची माहिती विद्यापीठास महाविद्यालयाकडून वेळेत प्राप्त झाली आहे काय?<br>● पूर्णतः प्राप्त का झाले नाही?<br>● वेळेत नावे न आल्या कारणामुळे प्रश्नपत्रिका काढताना अडचणी येतात. वेळेत नावे न पाठविलेल्या महाविद्यालयावर काय कारवाई केली?</td><td colspan="3">अंशतः प्राप्त झाली आहे.<br>130 महाविद्यालयांपैकी 94 महाविद्यालयांनी माहिती दिलेली आहे ज्यांनी दिलेली नाही त्यांना स्मरण पत्रे दिलेली आहेत.<br>स्मरण पत्र पाठविले आहे.</td></tr>
<tr><td>11</td><td>PET परिक्षेच्या पहिल्या 'जनरल' पेपरचा अभ्यासक्रम काय आहे?<br>● या वेळची PET ची प्रश्नपत्रिका अभ्यासक्रमानुसार निघाली नव्हती त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. त्यावर परीक्षा विभागाने काय कार्यवाही केली?</td><td colspan="3">पीएच. डी. नियमावली आर. पीएच. डी. 3 (ii) नुसार<br>यावर्षीची प्रश्नपत्रिका पहिल्या पेपरची एका माध्यमातून निघाल्यामुळे ज्या माध्यमातील मुलांना अडचण होती. त्यांचा त्याचा फायदा केलेला आहे. PET ची प्रश्नपत्रिका ही अभ्यासक्रमावर आधारित होती.</td></tr>
<tr><td rowspan="6">12</td><td rowspan="6"><u>डॉ. कोळेकर टी. एन.</u><br>सोलापूर विद्यापीठातील किती शिक्षक पदे रिक्त आहेत?<br>● सदरची शिक्षक पदे भरण्यासाठी किती वेळा जाहिरात देण्यात आली आहे?</td><td colspan="3">डॉ. सुर्यवंशी एस. एस.<br>04 शिक्षक पदे</td></tr>
<tr><td>संकुल</td><td>पद</td><td>जाहिरात</td></tr>
<tr><td rowspan="2">संगणकशास्त्र संकुल</td><td>प्राध्यापक (खुला) पद -1</td><td>6 वेळा</td></tr>
<tr><td>सहयोगी प्राध्यापक (अ.जा.) पद - 1</td><td>6 वेळा</td></tr>
<tr><td rowspan="2">पदार्थ विज्ञान संकुल</td><td>सहयोगी प्राध्यापक (अ.जा.) पद - 1</td><td>5 वेळा</td></tr>
<tr><td>सहाय्यक प्राध्यापक (अ.ज.) पद - 1</td><td>4 वेळा</td></tr>
<tr><td>13</td><td><u>प्रा. श्रीमती विभूते एस. बी.</u><br>मंगळवार दिनांक 16/10/2012 रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावा प्रमाणे शासनाने पगार बंद केलेल्या त्या 12 (बारा) कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकले आहे काय?</td><td colspan="3">ॲड. सलगर बी. एस.<br>नाही.</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | ● सेवामुक्त केले नसल्यास त्याची कारणे कोणती आहेत? | प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| | ● शासनाने पगार नाही दिल्यास त्या कर्मचाऱ्यांच्या पगाराचा बोजा कोणावर पडणार? | शासनाने स्थगिती उठविली आहे त्यामुळे प्रश्न राहत नाही. त्यामुळे कोणावरही पगाराचा बोजा पडण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| | ● व्यवस्थापन परिषदेमध्ये दि.16/10/2012ला जो ठराव झाला त्यानुसार त्या कर्मचाऱ्यांना सेवा मुक्त करणे गरजेचे होते, असे असताना व्यवस्थापन परिषदेचा ठराव डावलला आहे का? | व्यवस्थापन परिषदेमध्ये असा ठराव झालेला नाही. शासनाने दिलेल्या स्थगिती ओदशाची अंमलबजावणी करावी एवढाच ठराव झाला आहे. |
| | ● या भरतीप्रक्रियेमध्ये नियमांचे पालन केले आहे का? | होय. |
| 14 | विद्यापीठात झालेल्या उपकुलसचिव व सहा. कुलसचिव या पदाच्या निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेमधील सदस्यातून त्यांनी सुचविलेले दोन प्रतिनिधी घेतले जातात. असे दोन प्रतिनिधी ज्या व्यवस्थापन परिषदेतून निवडले तो व्यवस्थापन परिषदेतील ठराव व दिनांक कोणती? | सद्यस्थितीत ही पदे भरताना अशी कोणतीही तरतूद नाही. |
| | ● सदरचे दोन सदस्य मा.कुलगुरुंनी नियमबाह्यपणे आपल्या पदाचा गैरवापर करुन दिले होते काय? | प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| | ● Standard Code वर्ग 1 च्या अधिकाऱ्याना लागू आहे किंवा नाही? | Standard Code वर्ग 1 च्या अधिकाऱ्यांना लागू होता. पण महाराष्ट्र शासनाने आता Standard Code रद्द करुन सर्व विद्यापीठांना MCSR लागू केला आहे. |
| | ● निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेचे दोन सदस्य कोणत्या नियमानुसार घेतले? | कुलगुरुंनी आपल्या अधिकारात घेतले होते. |
| | ● नियमबाह्य वर्तनामुळे झालेल्या निवडी कायदेशीर दृष्ट्या शासनाने अथवा न्यायालयाने रद्द केल्यास त्यास कोणते अधिकारी जबाबदार असतील? | नियमबाह्य भरती झालेली नाही. भरती प्रक्रियेबाबत कोणत्याही कोर्टात प्रकरण चालू नाही. |

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)